# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:23.06.2026** **वार:मंगळवार**

1. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात; पहिल्याच दिवशी 97 हजार 706 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर
2. विधान परिषदेच्या निवडणुकीत 11 पैकी 10 जागांवर महायुतीला विजय
3. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांचा शिवसेनेत प्रवेश
4. उत्तर प्रदेशात लखनौ इथं कोचिंग क्लासला लागलेल्या आगीत 15 विद्यार्थ्यांचा मृत्यू आणि
5. नैऋत्य मोसमी पावसाची राज्यात आगेकूच

**विधिमंडळ अधिवेशन**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला कालपासून मुंबईत सुरुवात झाली. काल पहिल्याच दिवशी एकंदर 97 हजार 706 कोटी 40 लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांसमोर सादर करण्यात आल्या. यात सर्वाधिक, 20 हजार 552 कोटी रुपयांची तरतूद पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी करण्यात आली आहे. त्याखालोखाल 10 हजार 7 कोटी 10 लाख रुपयांची तरतूद केंद्र शासनाकडून राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेअंतर्गत बिनव्याजी कर्जासाठी केली आहे. विकसित भारत जी-राम-जी योजनेसाठी केंद्र आणि राज्याचा हिस्सा 7 हजार 367 कोटी 32 लाख रुपये आहे, तर सिंहस्थ कुंभमेळ्याचं नियोजन आणि अंमलबजावणीसाठी 3 हजार कोटी रुपयांच्या निधीची तरतूद आहे.

सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नवनिर्वाचित सदस्य सुनेत्रा पवार आणि अक्षय कर्डिले यांना सदस्यत्वाची शपथ दिली.

मोसमी पावसाला विलंब झाल्यानं राज्याच्या विविध भागांत पाणीटंचाई निर्माण झाल्याचा मुद्दा काँग्रेस नेते नाना पटोले यांनी सभागृहात उपस्थित केला. ते म्हणाले.....

**जे तलाव होते, दम होतं, नद्या होत्या, छोटे नाले होते त्यांना वेळेवर पाणी थांबवलं असतं आणि ते पाणी आता भरलं असतं तर पिण्याच्या पाण्याचा महत्वपूर्ण प्रश्न आपल्याला सोडवता आला असता. आणि अशा या परिस्थितीमध्ये महाराष्ट्रातली जनता आणि शेतकरी हे दोघेही अडचणीत आलेले आहेत**.

पटोले यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर योग्य चर्चा घडवून आणायचं आश्वासन अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहाला दिलं.

विधानपरिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेच्या नवनिर्वाचित सदस्यांचा सभागृहाला परिचय करून दिला.

ज्येष्ठ गायिका दिवंगत आशा भोसले, सुमन कल्याणपूर, यांच्यासह सभागृहाच्या दिवंगत सदस्यांना दोन्ही सभागृहांमध्ये श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<u>विधान परिषदस्था.स्व.संस्था निवडणुका निकाल</u>**

राज्य विधान परिषदेच्या अकरा जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे निकाल काल जाहीर झाले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींद्वारे निवडल्या जाणाऱ्या विधान परिषदेच्या द्वैवार्षिक निवडणुकीत 17 पैकी 16 जागा जिंकत महायुतीने दणदणीत विजय मिळवला आहे. एका जागेवर अपक्ष उमेदवाराचा विजय झाला. महाविकास आघाडीला एकही जागा जिंकता आली नाही. निवडणुकीच्या, मतदारसंघनिहाय निकालांची अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधिकडून.....

**राज्य विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत, छत्रपती सांभाजीनगर-जालना मतदारसंघातून महायुतीचे सुहास शिरसाट विजयी झाले. जळगाव मतदारसंघात, महायुतीचे, भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नंदकिशोर महाजन विजयी झाले.**

**धाराशिव-लातूर-बीड मतदारसंघात, महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनी विजय मिळवला.**

**सोलापुरमध्ये भाजपाचे राजेंद्र राऊत, सांगली-सातारा मतदारसंघात भाजपाचे धैर्यशील कदम, भंडारा-गोंदियामध्ये भाजपचे अविनाश ब्राह्मणकर विजयी झाले.**

**अमरावतीत महायुतीचे प्रवीण पोटे विजयी झाले. नांदेड मतदारसंघात, कॉंग्रेसमधून भाजपात आलेले अमरनाथ राजूरकर, मोठ्या मताधिक्याने विजयी झाले, तर परभणी-हिंगोली मतदारसंघात शिवसेनेचे सईद खान विजयी झाले.**

**नाशिकमध्ये मात्र शिवसेनेच्या नरेंद्र दराडे यांना, अपक्ष उमेदवार गोकुळ गीते यांच्याकडून पराभव पत्करावा लागला.**

**नागपूर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत भाजपचे राजीव पोतदार यांचा विजय झाला.**

**या निवडणुकीत, पुण्यातून राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे विक्रम काकडे, अहिल्यानगरमधून प्राजक्त तनपुरे, ठाण्यातून शिवसेनेचे रविंद्र फाटक, कोकणातून राष्ट्रवादीचे अनिकेत तटकरे, यवतमाळमधून शिवसेनेचे दुष्यंत चतुर्वेदी आणि वर्धा-गडचिरोली-चंद्रपूरमधून भाजपचे अरुण लखानी हे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.**

**आकाशवाणी बातम्यांसाठी, आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांसह, पुण्याहून सविता म्हसकर.**

**<u>उबाठा खासदार-शिवसेना प्रवेश</u>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सहा खासदारांनी काल मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. या खासदारांमध्ये ओमराजे निंबाळकर, संजय जाधव, संजय

देशमुख, भाऊसाहेब वाकचौरे, संजय दिना पाटील आणि नागेश पाटील-आष्टीकर यांचा समावेश आहे. घटनेच्या आणि कायद्याच्या चौकटीत राहून हे पक्षांतर करण्यात आल्याचं शिंदे यांनी यावेळी सांगितलं. या सर्व खासदारांच्या मतदारसंघातले प्रश्न सोडवले जातील, त्यांना विकसनिधी कमी पडू दिला जाणार नाही, तसंच त्यांना आणि त्यांच्या कार्यकर्त्यांना सन्मानाने वागवण्यात येईल अशी ग्वाही शिंदे यांनी यावेळी दिली.

**<u>पद्म पुरस्कार</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात दुसऱ्या टप्प्यातील पद्म सन्मान प्रदान करणार आहेत. दोन मान्यवरांना पद्म विभूषण, सात पद्म भूषण आणि 56 पद्मश्री सन्मान आज प्रदान केले जातील. अभिनेते मम्मूट्टी, पार्श्वगायिका अलका याज्ञिक आणि क्रिकेटपटू रोहित शर्मा यांच्यासह 65 मान्यवरांना राष्ट्रपतींच्या हस्ते सन्मानित केलं जाणार आहे.

**<u>सोलापूर</u>**

पंढरपूरच्या श्री विठ्ठल-रुक्मिणी मूर्तीवरच्या रासायनिक वज्रलेपनाला पंढरपूरच्या दिवाणी न्यायालयाने स्थगिती दिली आहे. वारकरी संप्रदाय आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाने या संदर्भात याचिका दाखल केली होती. त्यावर काल झालेल्या सुनावणीत, न्यायालयाने मूर्तीवर कोणत्याही प्रकारचं लेपन करण्यास मनाई केली आहे. मंदिर समिती आणि पुरातत्त्व विभागाकडून हे रासायनिक वज्रलेपन केलं जाणार होतं.

**<u>शेगांव-पालखी</u>**

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूरसाठी, शेगावमधून प्रस्थान ठेवलेल्या संत श्री गजानन महाराजांच्या पालखीचं काल अकोला जिल्ह्यातील भौरद इथं आगमन झालं. जिल्ह्याच्या सीमेवर तसंच मार्गावरील विविध गावांमध्ये भाविकांनी पालखीचं उत्साहात स्वागत केलं.

**<u>आग-लखनौ</u>**

उत्तर प्रदेशातील लखनौ मधील अलीगंज भागात, एका कोचिंग सेंटरमध्ये काल लागलेल्या आगीत, 15 जणांचा मृत्यू झाला, तर नऊ जण जखमी झाले. मृतांमध्ये बहुतांशी 14 ते 16 वयोगटातील विद्यार्थी आहेत. अलीगंजमधील पुरनिया भागात एका ॲनिमेशन कोचिंग सेंटरमध्ये ही आग लागली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. 'पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधी'तून मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची, तसेच जखमींना 50 हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे. या प्रकरणी आता पर्यंत सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून चार जणांना अटक करण्यात आली आहे.

**<u>शंकरराव मिलके-निधन</u>**

रत्नागिरीतले माजी सैनिक आणि राष्ट्रीय जलतरणपटू, तसंच जलतरण प्रशिक्षक शंकरराव मिलके यांचं काल पुण्यात अल्पशा आजाराने निधन झालं. ते 86 वर्षांचे होते. मेंदूच्या विकारामुळे गेले 15 दिवस

त्यांच्यावर पुण्यातल्या मिलिटरी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. वयाच्या 80व्या वर्षी त्यांनी राष्ट्रीय मास्टर्स जलतरण स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावलं होतं.

**<u>सिलंबम</u>**

प्राचीन भारतीय पारंपरिक युद्धकला असलेल्या सिलंबम या क्रीडा प्रकाराच्या आंतरराष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा येत्या 1 आणि 2 ऑगस्ट रोजी मलेशियामध्ये होणार आहेत. या स्पर्धेसाठी पिंपरी-चिंचवडमधील 21 खेळाडूंची निवड झाली आहे. जालना इथं नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय सिलंबम अजिंक्यपद स्पर्धेतून भारतीय संघाची निवड झाली.

**<u>पाऊस</u>**

गडचिरोली, धुळे आणि नंदुरबार शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात काल मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस झाला.

रत्नागिरी जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांमधेही काल पावसाचं आगमन झालं. मात्र, अद्यापही जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाणीटंचाई असून, नागरिकांनी पाणी काटकसरीने वापरण्याचं आवाहन जिल्हाधिकारी मनुज जिंदल यांनी केलं आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या बहुतांश भागात, काल वीजांच्या कडकडाटासह पाऊस पडला.

कोल्हापूर जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाच्या हलक्या सरी बरसल्या.

भंडारा जिल्ह्यात काल वादळी वाऱ्यांसह पाऊस झाला. जिल्ह्यात विविध ठिकाणी काल वीज पडून एका महिलेचा मृत्यू झाला. काही शेळ्या आणि 1 म्हैस देखील मरण पावली.

**<u>जालना-शाळा वेळ बदल</u>**

राज्यात बऱ्याच ठिकाणी पावसाचं आगमन झालं असलं तरी, काही भागात अजूनही उष्णतेची तीव्रता कायम आहे. वाढतं तापमान लक्षात घेऊन जालना, बीड आणि लातूर जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरवण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनानं दिले आहेत.

**<u>हवामान</u>**

नैऋत्य मोसमी पावसाने काल तळकोकणातून आगेकूच करत कोकण, पश्चिम महाराष्ट्राच्या पुढच्या काही भागापर्यंत मजल मारली.  रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, सातारा, कोल्हापूर, सांगली आणि पुणे जिल्ह्याच्या काही भागांत तो सक्रिय झाला आहे.  येत्या 24 तासांत मुंबई, ठाणे, पालघर आणि कोकणात तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यांसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर विदर्भात काही ठिकाणी उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**